
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५६ वे, अंक ८वा, मुंबई । ऑक्टोबर २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 8, Mumbai I October 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## रौप्य महोत्सवी परिषदेनिमित्त शिल्लक रकमेचा धनादेश श्री. नितीन शहापूरकर, अध्यक्ष, वडोदरा संस्थेच्यावतीने मध्यवर्ती संस्थेस प्रदान





देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५६वे, अंक ८वा,
ऑक्टोबर २०२३
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
**मो. : ९८६७९९४३८९**

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई-मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in




**देशस्थ ऋग्वेदी संस्था, नाशिक आयोजित कै. आचार्य अत्रे वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थी गौरव**




**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, वडोदरा आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा**



**श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष, मध्यवर्ती संस्था यांचा वडोदरा संस्थेच्यावतीने सत्कार**


INDIA'S BEST BANKS AWARDS
FE
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates
on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF*
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE*
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# मनोगत

मा. सभासद बंधु भगिनींनो,

प्रथमता दि. ३०.०९.२०२३ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपले विचार आमच्यापर्यंत पोहचविल्या बद्दल तसेच आतापर्यंत आम्ही केलेल्या कार्याची नोंद घेऊन अभिनंदन केल्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार.

ही सभा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली व अनेक उपस्थितांनी त्यांचे मत प्रदर्शन करून आम्हाला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आम्ही सर्व त्यांचे सदैव ऋणी आहोत.

या ऐतिहासिक सभेत सर्व प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

सभेच्या अग्रसूचनेवरील प्रस्तावाव्यतिरिक्त खालील महत्त्वाचे ठराव वरील सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

१) भविष्यात जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा संस्थेच्या वास्तुचा पुर्नविकास करतांना संस्थेची स्थावर जंगम मालमत्ता कोणत्याही व्यक्ती व संस्थेच्या नावे न करता म्हणजेच कोठल्याही विकासकाला न नेमता ती संस्थेच्या स्वतःच्या निधीतून / गंगाजळीतून वा संस्थेने उभारलेल्या निधीतून करण्यात यावी.

२) संस्थेची सभासद वर्गणी आजीव सभासद शुल्क रु. ६००/- वरुन रु. १,०००/- करण्यात यावे.

३) संस्थेच्या प्रस्तावित निवडणूका जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात याव्यात.

४) ॲड्. राजेंद्र मुदळकर यांची पुढील निवडणूकीसाठी निवडणुक अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात यावी.

५) संस्थेच्या वाढलेल्या कामाचा व्याप बघता श्री. मिलिंद सरदेशमुख यांची कार्यवाह पदी नेमणुक करण्यात यावी.

वरील सभेचे सविस्तर इतिवृत्त यथाअवकाश आपल्याला पाठविण्यात येईल. सदर इतिवृत्त आपल्याला इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठविण्यात येईल.

कळविण्यास आनंद वाटतो की, कालच्या सभेच्या दिवशी ३० नवीन सभासद अर्ज आपल्या परिवारात जोडले गेले आहेत, त्यांचे स्वागत. तसेच उपस्थित सर्व कार्यकारी मंडळ / परिषद सदस्यांचे व इतर सभासदांचे मनःपूर्वक आभार.

अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सभेचे अध्यक्षपद यशस्वीरित्या पार पाडले. त्याबद्दल त्यांचेहि मनःपूर्वक आभार.

आपल्या सर्वांचे प्रेमसंबंध असेच रहावे व त्यामुळे आम्हाला मिळत असलेली उर्जा वृध्दिंगत व्हावी, हि श्री गणेश चरणी प्रार्थना.

लोभ आहेच तो वृध्दिंगत व्हावा.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

आपले,<br>
**प्रभाकर कुलकर्णी**<br>
कार्याध्यक्ष

# सुख आणि समृद्धीचा शोध व अध्यात्म याची सांगड कशी घालावी?

**स. भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

मानवाची सुख आणि समृद्धीच्या मागे असणारी धावाधाव सर्वांना माहित आहेच. जगात असा कोणीही नसेल ज्याला सुखी आणि समृद्ध व्हायचे नाही. आपण देवांना, गुरुजनांना, संतांना आपल्या सुखासाठी व समृद्धीसाठी नेहमीच साकडे घालत असतो. आपण आपल्या सुखांसाठी विविध प्रार्थना करतो, देवीदेवतांची भक्ती करतो. खरे पाहता यात चूक काहीच नाही पण हे करत असताना आपण आपल्या सुखाची नेमकी व्याख्या काय केली आहे? हे तपासून घेतले पाहिजे. जोपर्यंत आपण शाश्वत सुखासाठी प्रयत्न करणार नाहीत तोपर्यंत आपण फसव्या सुखाच्या चक्रव्यूहात अडकून पडलेले असू.

फसवे सुख म्हणजे भौतिक गोष्टींच्या पाठीमागे असणारी आपली धडपड. आपण भौतिक गोष्टी जरुर मिळवाव्यात आणि आपले भविष्य सुरक्षित करावे परंतू हे एका मर्यादेपर्यंतच ठीक असते. खरे सुख भौतिक गोष्टीत नसते हे आपल्याही लक्षात येतच असते. खऱ्या सुखाची व्याख्या न समजल्याने अनेकांना असे वाटते की जेवढी आपली संपत्ती किंवा सत्ता जास्त असेल, तेवढ्या मोठ्या प्रमाणात आपल्याला सुख लाभेल, पण असे होताना दिसत नाही. मानवाचे आयुष्य त्रिविध तापाने होरपळून निघत असते. स्वतःच्या संचितानुसार तो अडचणी व भोग भोगत असतो. या सर्वांवर उपाय म्हणून त्याला फक्त भौतिक सुखच दिसते. आयुष्यातील तापांवर फुंकर ही भौतिक सुखानेच शक्य आहे असा त्याचा समज असतो.

घर, गाडी, पद, प्रतिष्ठा इ. गोष्टी मिळाल्या म्हणजे आपण सुखी झालो आपली समृद्धी झाली असे अनेकांना वाटते. खरे पाहता अनेकांना हे सर्व मिळूनही ते सुखी असतात का ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सर्व प्रकारची समृद्धी मिळवूनही ते सुखाच्या शोधातच असतात. सुख त्यांना सापडलेले नसतेच.

अध्यात्म आपणांस खऱ्या सुखाची व्याख्या समजून देण्यास मदत करते. खरेतर अध्यात्मामुळेच आपल्याला खरी दृष्टी प्राप्त होते ज्यामुळे आपण सुख व समृद्धीची खरी संकल्पना समजून घेऊ शकतो. अध्यात्म आणि सुख यात एक दृढ नाते आहे. मनःशांती, आत्मिक समाधान व जीवनाची सार्थकता यातच खरे सुख आहे. आपल्या मनाचा संतोष, आपल्या नातेसंबंधांची परिपूर्णता, सामाजिक संबंधातील सौहार्दपूर्ण व्यवहार हेच सुखाचे परिमाण असू शकते. सुखाचा मार्ग अंतःकरणातून सुरु होतो व बाहेरील जगात संपतो. आपण यापेक्षा उलट मार्गाने म्हणजे बाह्य जगातून मनाचे सुख साधण्याचा प्रयत्न केला तर ते साध्य होऊ शकत नाही.

अध्यात्म आपणांस स्वातंत्र्य व स्वतंत्र विचार प्रदान करते. स्वातंत्र्य हे सर्वात मोठे सुख आहे आणि ते प्राप्त करण्यासाठी आपल्याला आपल्या बंधनांची स्थिती अवगत होणे आवश्यक असते. अध्यात्म आपणांस ती दृष्टी देते. अध्यात्मिक विकासामुळे आपल्या मनात दया व सेवाभाव जागृत होतो. अध्यात्मिक वाचन, चिंतन आणि मनन करण्याने आपली मानसिक व बौद्धिक प्रगल्भता वाढते, मनाचा विस्तार होतो. तसेच भूतदया आणि वैश्विक कल्याणाचा विचार वाढू लागतो. अशाप्रकारचे जीवन हे समृद्ध असते. अध्यात्मामुळेच अशा प्रकारची समृद्धी मिळवण्याचे अगणित मार्ग आपल्यासमोर येतात. अध्यात्मातूनच मनःशांती मिळू शकते आणि ती मिळवण्यासाठीचा राजमार्ग म्हणजे श्री समर्थ रामदास स्वामींचे वाङ्मय होय. दासबोधाचे वाचन, चिंतन आणि मनन केल्याने आपणास सुख आणि समृद्धीचा खरा मार्ग सापडेल.

# संलग्न संस्था वृत्त

**नाशिक** : आचार्य अत्रे वकृत्व स्पर्धा संपन्न - देशस्थ ऋग्वेदी संस्थेतर्फे इयत्ता पाचवी ते सातवी वयोगटासाठी कै.आचार्य अत्रे जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे उदघाटन दुर्गा मंगल कार्यालयातील गो. ह. देशपांडे सभागृह येथे अक्षदा मानसी माधव देशपांडे यांच्या हस्ते झाले तर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शास्त्रज्ञ अपूर्वा जाखडी यांच्या हस्ते संपन्न झाला. प्रास्ताविक व स्वागतसंस्थेचे अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी यांनी केले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे प्रथम देवयानी दिनेश चौधरी उंटवाडी इंग्लिश मीडियम स्कूल प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह व २१०० रुपये रोख, द्वितीय अर्णव अतुल कुलकर्णी एम एस कोठारी अकॅडमी प्रशस्तीपत्रक, स्मृतीचिन्ह व १५०० रुपये रोख, तृतीय आराध्या योगेश सायखेडे देवळाली हायस्कूल देवळाली कॅम्प प्रशस्तीपत्रक स्मृतीचिन्ह व ११००/- रुपये रोख तर उत्तेजनार्थ मुद्रा सतीश धनवटे मराठा हायस्कूल, समीक्षा प्रवीण वराडे बाल शिक्षण मंदिर गोरेराम लेन, आश्लेषा धनंजय काळे र.ज. चव्हाण बिटको हायस्कूल, ईश्वरी सागर माळोदे मराठा हायस्कूल गंगापूर रोड, तसेच परीक्षकांच्या शिफारशीनुसार करिष्मा प्रेम थापा जनता विद्यालय गांधीनगर या सर्व उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना ५०१/- रुपये रोख व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. सांधिक चषक बाल शिक्षण मंदिर गोरे राम लेन नाशिक या शाळेतील समीक्षा प्रवीण वराडे व रेणुका सतीश मानकर या विद्यार्थिनींना देण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर मकरंद सुखात्मे, सुहास पाटील, मुकुंद कुलकर्णी, उर्मिला वाटवे, रमेश देशमुख उपस्थित होते. या प्रसंगी संस्थेचे विश्वस्थ एम इ कुलकर्णी, व. य. कुलकर्णी विविध शाळांचे शिक्षक, विद्यार्थी तसेच संस्थेचे सभासद उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा प्रमुख निषाद दशपुत्रे, राजेंद्र हातवळणे, अनंत दशपूत्रे, अजय चौधरी, प्रशांत निरंतर, मंदार तगारे, सचिन निरंतर, संदीप गोसावी, किशोर हींगणे, सविता कुलकर्णी, सुजाता करजगिकर, सुचिता देवरे, माधवी तगारे, रश्मी हातवळणे, मनीषा पाटील यांनी परिश्रम घेतले.

**मुंबई** : माहे सप्टेंबर २०२३ च्या समाचार अंकात वार्षिक सर्वसाधारण सभेचा दि. ३० नोव्हेंबर २०२३ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चा अहवाल असे चुकुन छापण्यात आले होते. त्याऐवजी ३० सप्टेंबर २०२३ तसेच आर्थिक वर्ष २०२२-२३ असे वाचण्यात यावे. मासिकाच्या छपाईत झालेल्या चुकीबद्दल क्षमस्व.

दि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाची कार्यकारी मंडळ आणि कार्यकारी परिषद यांची संयुक्त सभा / वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहीम, मुंबई ४०००१६ कार्यालयात श्री. विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेच्या हिताचे तसेच अनेक निर्णय या सभेत घेण्यात आले. श्री. मिलिंद सरदेशमुख यांची सर्वानुमते सचिव पदी नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी केली. मिलिंद सरदेशमुख यांनी संस्थेसाठी करीत असलेल्या कार्याचा गौरव व अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. या वार्षिक सर्वसाधारण सभेस मुंबई, मुलुंड, डोंबिवली, कल्याण, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, मंगळवेढा, कोथरुड, नांदेड, अकोला, वडोदरा, बेळगाव आदि संस्थांचे सभासद आणि पदाधिकारी उपस्थित होते. या वार्षिक सर्वसाधारण सभेत आगामी निवडणुका जानेवारी २०२४ मध्ये घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच आर्थिक वर्ष २०२२-२३ या वर्षाची सनदी लेखापालानी तपासलेली हिशोब पत्रके व ताळेबंद आणि या आर्थिक वर्ष २०२३-२४ चे अंदाजपत्रक ही मंजूर करण्यात आला.

**वडोदरा (गुजरात)** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ वडोदरा संस्थेची ४५ वी वार्षिक समग्र सभा तसेच विद्यार्थी गुणगौरव आणि सन्मान पुरस्कार कार्यक्रम रविवार दिनांक १७.०९.२०२३ रोजी यब्राह्मण सभाल दांडिया

बाजार, वडोदरा येथे आयोजित करण्यात आला होता. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या मान्यवरांना गौरविण्यात आले. मध्यवर्ती संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, समाचारचे संपादक श्री. मिलिंद सरदेशमुख आणि श्री. आनंद कुलकर्णी, बडोद्याचे श्री. रामतीर्थ, श्री. प्रकाश कुलकर्णी, सौ. अंजली सुरतकर, दादा भगवानदासचे विश्वस्त श्री. जयप्रकाश अमीन, श्री. अमित ठोसर, श्रीमती अर्चना देशपांडे, श्री. पूर्णेदू शहापूरकर यांना गौरविण्यात आले. याच सोहळ्यात सात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव देखील मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या हृदय सोहळ्यास वडोदरा येथील थोर सामाजिक कार्यकर्ते कर्नल डॉ. संजीव राजाराम धारवाडकर हे उपस्थित होते. संस्थेच्या वतीने डॉ. श्री. धारवाडकर यांनी वयाच्या ७५ नंतरही पीएचडी मिळविली आणि त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल शाल, श्रीफळ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी त्यांना देण्यात आलेल्या सन्मानपत्राचे लेखन व वाचन सौ. माधवीताई मोगरकर यांनी केले.

या समग्रसभेत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था वडोदराच्या अध्यक्षपदी श्री. शरद माळपांडे, उपाध्यक्ष श्रीमती रोहिणी बक्षी, सचिव श्री. नितीन शहापुरकर, सहसचिव श्रीमती स्वाती सुरतकर, खजिनदार श्री. प्रदीप खिरवडकर, मददनिस श्रीमती अंजली सुरतकर यांची पुढील दोन वर्षांच्या कालावधीसाठी पदाधिकारी म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा.

## भारतीय खेळाडूंचे अभिनंदन

चीनमधील हांग्जोऊ येथे भरलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने १०७ पदकांची विक्रमी नोंद केली आहे. आशिया क्रिडा स्पर्धेच्या इतिहासातील भारताची ही विक्रमी पदके आहेत. विजेत्या सर्व भारतीय खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन. भारताने या आशियाई क्रिडा स्पर्धेत ६५१ खेळाडूंचा समावेश होता. भारताच्या या पथकात ३२९ पुरुष व ३२२ महिला ॲथलिटचा समावेश होता. भारताने विक्रमी २८ सुवर्ण, ३८ रौप्य, ४१ कास्य पदकावर आपले नाव कोरले आहे. नेमबाजी आणि तिरंदाजी या दोन क्रिडा प्रकारात भारताने उच्च दर्जाची कामगिरी केली आहे. एशियाडच्या पदक क्रमवारीत चीन, जपान आणि दक्षिण कोरीया सारख्या खास खेळावर प्रचंड मेहनत घेणाऱ्या देशानंतर भारत ४ थ्या क्रमावर आहे. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंची प्रचंड मेहनत आणि जिद्द प्रामुख्याने दिसून आली. भारताचे बरेचसे खेळाडू प्रथमच एशियाडसारख्या मोठ्या स्पर्धेत भाग घेत होते. तरीही कोणत्याही दडपणाखाली कामगिरी न करता अतिशय चांगली कामगिरी करून दाखविली आहे. १९५१, १९६२ नंतर २०१८ च्या जकार्ता एशियाडमध्ये भारत ८ व्या क्रमांकावर होता. २०२३ च्या हांग्जोऊ एशियाडमधील ४ था क्रमांक ही भारताची सर्वोत्तम कामगिरी आहे. बॅडमिंटन एकेरी पदक, अश्वरोहण, क्रिकेट, बॉक्सींग, भालाफेक, नेमबाजी, ॲथलेटीक्स वगैरे खेळामध्ये भारताने प्राविण्य मिळविले आहे. भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्ष श्रीमती. पी.टी. उषा यांचेदेखील अभिनंदन. १५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे सत्र मुंबईत आयोजित होणार आहे. भारताचे हे यश यखेलो इंडियाल तून पुढे येणारे गुणवान खेळाडू, केंद्र सरकारचे भक्कम आर्थिक पाठबळ यांचे आहे. खेळाडूंच्या पाठीश भक्कम उभा असणाऱ्या व त्यांना चांगल्या सुविधा मिळवून देणाऱ्या स्वयंसेवी संस्थाचे देखील मनापासून अभिनंदन.

**– मिलिंद सरदेशमुख**
संपादक

# आजच्या काळातील श्रीकृष्ण

**सौ. हर्षदा मुकुंद पांडे** (मो. : ९८२१६८६९३४)

आपल्या जीवनाचा मार्गदर्शक कोण? आपल्या विचारांचे होकायंत्र कोण? आपल्या बुद्धीचा दिशादर्शक कोण? हे प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत नाही का? खरंतर धर्मराज युधिष्ठीर शूर, लढवैय्या दुर्योधन, बलवान गदाधर भीम, सर्वश्रेष्ठ धनुर्धर अर्जुन, अमर्याद बंधूप्रेम असलेला दुःशासन, प्रेमळ न्यायप्रिय नकुल-सहदेव ही सगळी रसायने आपल्या सगळ्यांमध्ये एकत्रितपणे असतातच! फक्त आपण कोणत्या प्रभावाखाली आहोत, कोणाच्या सान्निध्यात आहोत, यामुळे आपल्या मधले अतिउच्च महत्त्वाकांक्षी व त्यासाठी धर्माची पायमल्ली करत अगदी आपल्या बांधवांचाही बळी देणारे कौरव जगासमोर येतात किंवा मग धर्मासाठी, अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी, अधर्माविरुद्ध, अन्यायाविरुद्ध रणशिंग फुंकून रणांगणात उतरणारे पांडव जगासमोर येतात! म्हणजेच प्रत्येकाच्या जीवनात, समाज जीवनात मार्गदर्शक कृष्ण असावाच असावा! खरंतर कपटी, आपल्या सख्ख्या बिहिणीच्या गांधारीच्या १०० पुत्रांचा वापर करून संपूर्ण भरतवंश नष्ट करायला निघालेल्या मामा शकुनीच्या प्रभावाखालील कौरव हे युद्ध करायला अतिशय उत्सुक होते. त्यांना, यतुम्ही हे युद्ध हर तऱ्हेने टाळले पाहिजे. पितामह भीष्प, गुरु द्रोणाचार्य वेळीच आवर घातला पाहिजे आणि निरपराध प्रजेचा रक्तपात टाळला पाहिजेल हे पटवण्याचा अतोनात प्रयत्न कृष्णाने केला! अगदी त्यासाठी स्वतः शांतीदूत बनून कृष्ण हस्तीनापूरलाही गेला होता. त्याच्या अगदी विरुद्ध... आपल्या स्वकियांच्या, आप्तेष्टांच्या, बांधवांच्या विरुद्ध युद्ध करण्यास पांडव तयार नव्हते. अगदी भर रणांगणातही अर्जुनाने आपले शस्त्र खाली ठेवायचा मानसिक हट्ट केला. पण यतुम्हाला धर्मरक्षणासाठी, सकल मानवजातीच्या कल्याणासाठी हे धर्मयुद्ध लढलेच पाहिजे!ल हेही देवकीनंदन श्रीकृष्णाने सर्वोतपरी पटवले आणि अर्जुनाचे सारथ्य करत प्रत्यक्ष रणभूमीत हजरही राहिला. परस्पर अगदी विरुद्ध समुपदेशन। कृष्ण - असा हा अतिशय गूढ, अवघड आहे समजायला, पण एकदा समजला कि विचारांची सुस्पष्टता आलीच म्हणूच समजा. विचारांची वादळी वावटळही उठत नाही व आपला अर्जुनही संभ्रमित होत नाही. अगदी जन्मल्यापासून गोपाळकृष्णाने अनेक जीवघेण्या संकटांना तोंड दिले आहे. पण प्रत्येक वेळी सावधगिरी व चाणाक्षपणा या गुणांनी श्रीकृष्णाचा जीव वाचलाय.

श्रीकृष्णाच्या बाललीला सर्वश्रुत आहेत. तो सुदामासारखा मित्र आणि आपले सगळेच बाल सवंगडी यांच्यावर त्याचे असीम प्रेम होते. नेतृत्व गुण आणि बोलण्यातल्या गोडव्याने कृष्णाने बालवयापासूनच करामती करत न्याय मिळवला. दूध, तूप, लोणी हे सारे खरंतर आम्हा बालगोपालांसाठी असायला हवे, पण त्यांच्यापासून लांब उंचावर लोणी ठेवले जायचे! खरंतर नंदलाल कृष्णाला या सगळ्यांची भरपूर सुबत्ता होती, पण आपल्या सगळ्या बालमित्रांनाही ते मिळाले पाहिजे या शुद्ध हेतूने बाळकृष्णाने माखन चोरी केली. अन्यमाखनचोरल हे भूषणही मिरवले!

शुद्ध हेतूने, सर्वसमावेशक न्यायासाठी जातपात, गरीब-श्रीपंत या सगळ्यांच्याही आधी माणूस म्हणून प्रत्येकाची ओळख श्रीकृष्णाने सांगितली आणि अशा समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी झटले पाहिजे हा मोठा संदेश अनेक बाललीलांमधून कृष्णाने दिला.

मागे दोन वर्ष साऱ्या जगावरच निसर्ग कोपला होता. करोना नावाचा महाभयंकर राक्षस साऱ्या मानवजातीला गिळंकृत करायला टपून बसला होता. रोज साऱ्या जगात ढीगाने प्रेतं जमा होत होती. सारे जीवनचं थांबले होते. मरणाची भीती... त्यातून आलेले नैराश्य... अशा अत्यंत भयावह स्थितीत अमेरिका-इंग्लंडसारख्या

बलाढ्य राष्ट्रांसमवेत जगासाठी भारतही फार मोठी आशा होती. युद्ध पातळीवर भारताचे करोनाविरुद्धची लस को-व्हॅक्सीन तयार केली, पीपीई किट, मास्कची निर्मिती केली. व्हेंटीलेटर्स तयार केले. करोना उपाय केंद्र उभी केली. आपल्या देशबांधवांचे प्राण वाचवण्यसाठी डॉक्टर्स, नर्स, औषधालय आपल्या जीवाची पर्वा न करता अविरत प्रयत्न करत होते. एवढेच नव्हे, तर भारताने त्यावेळी आपल्या शेजारील मित्र राष्ट्र मिळून १५० देशांना Covaxing, life support system, lifesaving drops पाठवले. म्हणजेच माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या मनात तर येऊनही गेले की, पाकिस्तान, अफगाणिस्तान अशा शस्तू राष्ट्रांना औषधाची मदत पाठवायची काय गरज आहे! पण माखनचोर कृष्णाच्या या भूमीत सकल मानवजातीचे कल्याण या शुद्ध हेतूचा संस्कार भारतीयांच्या मनावर खोलवर झालेला आहे याची प्रचिती आली आणि करोनाविरुद्धचे औषध हे माखन भारताने जगभर वाटले. आज भारताला यविश्व औषधालयल म्हणून ओळख मिळाली आहे! (क्रमशः)

## लोकमान्य टिळक आणि ठाणे

**संकलन : मिलिंद सरदेशमुख (मो. ९८६७९९४३८९)**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि ठाणे यांचं नातं विशेष स्नेहाचे, सौख्याचं आणि आपुलकीचं होतं. एकतर लोकमान्यांनी 'केसरी' सुरू करण्याच्या १५ वर्षे आधी (सन १८६६) काशीनाथपंत फडक्यांनी ठाण्यात 'अरुणोदय' साप्ताहिक सुरू केलं होतं. पुढे काशिनाथपंतांच्या चिरंजीवांनी - धोंडोपंत फडक्यांनी लोकमान्यांना गुरू मानून त्यांचाच जहाल बाणा 'अरुणोदय' मधून सुरू ठेवला. परिणामी लोकमान्यांवर इंग्रज सरकारने जेंव्हा राष्ट्रद्रोहाचा खटला चालविला तेंव्हा धोंडोपंतांवरही तेच कलम लावून खटला दाखल केला. आता काय करावे? म्हणून सल्ला घ्यायला धोंडोपंत पुण्याला टिळकांकडे गेले तर टिळक 'अरुणोदय'मधील धोंडोपंतांचा 'तोच' लेख वाचत होते. त्यांनी सल्ला दिला की तुरुंगात जायचं नसेल तर सरकारची माफी मागा. धोंडोपंतही टिळकांचेच चेले होते, तुरुंगात धाडलं तरी बेहत्तर पण माफी मागणार नाही असंच त्यांनी सांगितले. नंतर सरकारने अरुणोदय साप्ताहिक तर बंद केलेच पण फडकेंचा छापखानाही जप्त केला.

लोकमान्य टिळकांचे ठाण्यातील वि. ल. भावे यांच्याशी ही स्नेह संबंध होते. भावेंनी पुढाकार घेऊन स्थापना केलेल्या मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे या ग्रंथालयाच्या तिसऱ्या वार्षिकोत्सवास - सन १८९६ मध्ये लोकमान्य प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तेंव्हा केलेल्या भाषणात लोकमान्य टिळक म्हणाले होते, बाहेरचे काही लोक असा आक्षेप काढतील की, पुस्तकांचा संग्रह ठाण्यात असून आम्ही बाहेरच्यांनी त्यांस का मदत करावी? तर मराठी भाषेत उत्तेजन देऊन तिचा ग्रंथ संग्रह वाढवायचा हे लक्षांत आणले म्हणजे वरील आक्षेप निरर्थक आहे असे वाटेल. भाषेने राष्ट्रात जोम येतो. महाराष्ट्रातील साधुसंतांनी व कविंनी संस्कृतातील ज्ञान भांडार खुले करून दिल्यामुळे जिकडे तिकडे कीर्तने होऊन धर्माभिमान व देशाभिमान ह्यांची जागृती झाली.

अशा संग्रहापासून लिहिणार वाचणारास फायदा होतो खरा परंतु आज अशांची संख्या फार थोडी आहे. म्हणून या बरोबरच व्याख्याने पाहिजेत, पूर्वी आपल्याकडे पोवाडे म्हणण्याची चाल होती. ती पासून या दृष्टीने फायदा होत असे.

या भाषणाला आरंभ करताना टिळकांनी असं म्हटलं होतं की वास्तविक मी या संस्थेचा सभासद नसल्याने अशा प्रसंगी मी अध्यक्ष व्हावे हे बरोबर नाही. नंतर टिळकांनी वर्गणी भरून ग्रंथालयाचे ते तहहयात सभासद झाले.

पुढे चिरोलखटल्यासाठी लोकमान्यांना हवे असलेले संदर्भ ग्रंथ तर वि. ल. भावेंनी ठाण्याहून पाठवले. पण त्याच बरोबर अर्थ सहाय्य ही केले. लोकमान्य टिळकांचे ठाण्यातील शेवटचे भाषण झाले ते शेणवी आळीत (आताची लोकमान्य आळी) सन १९२० मध्ये आणि त्यापासून स्फूर्ती घेऊन तिथे जो गणेशोत्सव सुरू झाला तो आजपर्यंत सुरू आहे.

ठाण्यातील गावदेवी मैदानाजवळच्या बागेतील लोकमान्य टिळकांचा पुतळा ही लोकमान्यांना अवघ्या ठाणे शहराने वाहिलेली आदरांजली आहे, म्हणून तर या पुतळ्यावर कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांचे, नेत्याचे, पक्षाचे नाव नाही, कारण लोकवर्गणीतून हा पुतळा उभा राहिला आहे.

**सर्व सभासद, हिंतचिंतक, देणगीदार, जाहिरातदार,**
**ज्ञातीतील समस्त बंधु-भगिनींना**
**दसरा आणि दीपावलीच्या**
**हार्दीक शुभेच्छा.**




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**
B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**
LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund
M. : 9930445721 / 9702837022
Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance *Specialist*

*Get Insured... & Be Secured....*

# श्री भगवान परशुराम

**संगीता कुलकर्णी** (मो. : ९८७०४५१०२०)

परशुराम हे भगवान विष्णूंचा सहावा अवतार समजले जातात.. त्यांचा जन्म जमदग्नी व रेणुकामाता यांच्या पोटी वैशाख शुक्ल तृतीयेला म्हणजेच अक्षय्य तृतीयेला झाला..

जमदग्नी ऋषी व माता रेणुका यांचे परशुराम हे पुत्र. अक्षय तृतीया हा त्यांचा जन्मदिन. या भार्गवरामाने परशु या शस्त्राने दुष्टांचे निर्दालन केले म्हणून ते परशुराम म्हणून ओळखले जाऊ लागले... परशुराम हे सप्तचिरंजीवांपैकी एक आहे.

भीमकाय देह, मस्तकी जटाभार, खांद्यावर धनुष्य व हातात परशू अशी परशुरामाची मूर्ती असते...

विष्णूचा सहावा अवतार मानल्या गेलेल्या भगवान परशुरामांचे स्वतंत्र चरित्र सांगणारा एकही प्राचीन ग्रंथ उपलब्ध नाही... रामायण महाभारतासह वेगवेगळ्या महापुराणांतून परशुरामांचे चरित्र तुकड्यातुकड्याने प्रसंगानुरूप आले आहेत.. तर काही पुराणांत परशुरामांसंबंधीच्या आख्यायिका आणि दंतकथाही वाचनात आल्या आहेत..

परशुरामाने स्वतःच्या वास्तव्यासाठी सह्याद्री पर्वतावरून शरसंधान करून अरबी समुद्रास मागे हटवले व तिथे कोंकणभूमी वसविली... कोकण भूमी ही परशुरामांनी निर्माण केलेली भूमी आहे... कोकणला देवभूमी मानण्यात येते. येथील सुंदर निसर्ग

अथांग सागराचे व सह्याद्रीच्या शिखरांचे सान्निध्य व लोकोत्तर महापुरुषांची जन्मभूमी हे कोकणचे वैशिष्ट्य या देवभूमीत शेकडो वर्षांचा इतिहास लाभलेली अनेक देखणी मंदिरे आहेत...

श्रीक्षेत्र परशुराम हे शेकडो वर्षांचा इतिहास लाभलेले महेंद्र पर्वतावरील तीर्थक्षेत्र आहे...चिपळूणपासून पाच मैलांवर असलेल्या या तीर्थक्षेत्रास श्रीपरशुरामांच्या वास्तव्यामुळे पौराणिक संदर्भ आहेत व परमहंस ब्रह्मेंद्रस्वामी यांनी तीनशे वर्षांपूर्वी तेथे उभारलेल्या प्रकल्पाला व महाराष्ट्रभर केलेल्या सार्वजनिक व हिंदवी स्वराज्याच्या कार्याला विशेष महत्त्व आहे. तसेच परशुरामाचे वास्तव्य कर्नाटकातील पवित्र 'गोकर्ण' क्षेत्री असल्याचेही मानतात. चिपळूण येथे 'लोटे परशुराम' हे त्यांचे जाज्वल्य स्थान मानले जाते. तसेच तळकोकणातील परशुराम मंदिर प्रसिद्ध आहे. काही कोकणस्थ ब्राह्मणांचे कुलदैवत परशुराम आहे.

परशुरामांची आई– माता रेणुका हिचे अस्तित्व 'माहूर गडा'वर असून ते साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. रेणुकामाता देखील महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक कुटुम्बांची कुलदेवता आहे. तिनेच आपल्या पुत्राला परशुरामाला चिरंजीवी बनवले होते...

भगवान परशुरामांनी हिमालयापासून कन्या–कुमारीपर्यंत आणि काश्मिरपासून अरूणाचलपर्यंत संपूर्ण भारत आपल्या कार्यकर्तृत्वाने सांस्कृतिकदृष्ट्या एकसंध केला होता.

देशभर पसरलेली परशुरामांची काही मंदिरे ..

निरमुंड – निरमुंड हे हिमालयाच्या अंतर्भागातील परशुरामांचे सर्वात महत्त्वाचे स्थान आहे. याच ठिकाणी पित्याच्या आज्ञेने परशुरामांनी माता रेणुकेचा शिरच्छेद केला म्हणून या स्थानाला निरमुंड या नावाने ओळखले जाते..

रेणुकागिरी ग्राम – हिमाचल प्रदेशातील परशुरामांचे हे स्थान उत्तरेला अतिदुर्गम भागात तिबेटच्या सीमेलगत आहे...

परशुराम कुंड – ईशान्य भारतातील अरूणाचल प्रदेशात चीन आणि ब्रह्मदेशच्या सीमेवर लोहित नदीपात्रात हे स्थान आहे...

कुरुक्षेत्र – हरियाणातील कुरुक्षेत्र प्रसिद्ध आहे. ते कौरव पांडवांच्या महायुद्धासाठी. या कुरुक्षेत्र परिसरातच पाच मोठी सरोवरे असून त्यातील ब्रह्म सरोवर हे परशुरामांशी संबंधीत प्राचीन स्थान आहे.

जम्मु येथील परशुराम मंदिर – हिमालयात परशुरामांचा वावर काराकोरम खिंडीपासून अरुणाचलपर्यंत होता. त्यामुळे या संपूर्ण प्रदेशात जागोजाग परशुरामांची लहानमोठी स्थाने आहेत. जम्मू प्रांतात शिरतानाच परशुरामांचे एक मंदिर उंच पर्वतावर उभे आहे...

जन्मस्थळ जानापावा – परशुरामांचा जन्म चंबळ नदीच्या खो–यात असलेल्या जमदग्नी आश्रमात झाला. एका उंच पर्वतावरील या आश्रमाच्या परिसराला जानापाव असे म्हटले जाते. प्राचीन काळापासून जमदग्नी आश्रम अशीच याची ओळख आहे. येथे जमदग्नी ऋषींची मूर्ति असणारे एक प्राचीन मंदिर आहे आणि जवळ परशुरामांची काळ्या दगडाची सुबक मूर्तीअसणारे दुसरे मंदिर आहे...

उदावड गुंफा मंदिर – राजस्थानीतील सादडी खेड्याजवळ हे उदावड मंदिर उंच टेकडीवरील गुंफेमधे आहे. आपल्याकडे प्रचलित असणा–या देवपंचायतनात परशुरामाचा समावेश नसतो पण या गुंफेमधे पंचायतन असून त्यातील मुख्य देवता परशुराम आहे व त्यांच्या शेजारी गणेश, कार्तिकेय, शिव आणि पार्वती यांच्या मूर्ती आहेत...परशुरामांची मूर्ती तपश्चर्या मुद्रेत आहे...

त्र्यंबकेश्वर – नाशिकजवळचे त्र्यंबकेश्वर १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक म्हणून प्रसिध्द आहे. त्र्यंबकेश्वराचा हा परिसर परशुरामांनी येथे केलेल्या घनघोर तपश्चर्येसाठीही ओळखला जातो. येथे पूर्वी परशुरामांचे प्राचीन मंदिर होते आता तेथे उभे असलेले मंदिर १२५ वर्षांपूर्वीचे आहे असे सांगितले जाते.. मंदिरातील परशुरामांची मूर्ती वैष्णव पध्दतीची म्हणजे चतुर्भुज आहे. परशुराम मंदिरात एक स्वतंत्र नारायण मूर्तीही असून ती काळ्या चमकदार गंडकी पाषाणाची आहे सम्राट सातवाहनांनी नाशिक क्षेत्री अश्वमेधासह मोठे यज्ञ केले. त्यांचे शिलालेख नाशिकजवळ मिळाले आहेत. परशुरामांची प्राचीन मूर्ती या यज्ञांच्या निमित्ताने स्थापन करण्यात आली असावी असे अनेक संशोधकांचे म्हणणे आहे..

त्र्यंबक-परशुराम क्षेत्र या नावाने हा परिसर ओळखला जातो...

शूर्पारक क्षेत्र – गेल्या अनेक वर्षांपासून शूर्पारक या नावाने ओळखले जाणारे बंदर म्हणजे आजचा वसईजवळचा नालासोपारा हा भाग.. येथे विमलासुराने यज्ञयागात व्यत्यय आणल्यामुळे परशुरामांनी शस्त्र हाती घेतले आणि त्याचा वध केला



अशी आख्यायिका सांगितली आहे. विमलासुराच्या अत्याचाराने उध्वस्त झालेला हा संपूर्ण परिसर परशुरामांनी स्वतः पुन्हा वसविला म्हणून तो परशुराम क्षेत्र या नावाने ओळखला जात असे. शूर्पारक हे त्याचे अपभ्रष्ट रूप आहे. परशुरामांची येथे असलेली मूर्ती काळ व काम सोबत असलेली आहे. रेणुका व जमदग्नी यांचीही स्वतंत्र मंदिरे येथे आहेत.

तिरूअनंतपूरम - केरळची राजधानी तिरूअनंतपुरम जवळच्या कलियार आणि कालामानायर आणि पार्वतीपू या दोन नद्यांचा संगम आहे. या संगमाला तिरूवल्लभवृंदा असे म्हटले जाते. या संगमाजवळच नदीकिनाऱ्यावर एक प्राचीन परशुराम मंदिर आहे. पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या या मंदिरात पोचण्यापूर्वीच प्रवेशद्वारावर आपले परशुरामांच्या एका भव्य मूर्तीने स्वागत होते. व्याघ्रांबरावर बसलेली सहा फूट उंचीची ही आसनस्थ मूर्ति आक्रमक असली तरी अभय देणारी आहे. या मूर्तीचे दर्शन घेऊन पुढे गेल्यावर उजवीकडे घनदाट झाडीत परशुरामांचे प्राचीन मंदिर आहे. खास दाक्षिणात्य पध्दतीच्या गोपुरसदृश मंदिरात मध्यभागी परशुरामांची चतुर्भुज मूर्ती आहे मूर्तीच्या हातात परशु, शंख, चक्र आणि कमंडलू आहेत त्यावरून ती वैष्णव पध्दतीची मानली जाते. या मूर्तीजवळच ब्रम्हदेव आणि शिव यांच्या सोपानयुक्त घुमट्या आहेत.

अष्टचिरंजीवांपैकी एक आणि निस्सीम मातृभक्त असणारे श्री परशुराम श्रीविष्णूंचा हा एकच अवतार असा आहे जो चिरंजीव आहे असे सांगितले जाते. परशुरामाचे खरे स्वरुप अत्यंत सच्चे, मातृ-पितृ भक्त असेच आहे.


**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील**

**खालील मंगल कार्यालये**

**तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# SHRI YASH TOURS

आयोजक - श्रीकांत पाटसकर

Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS
E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | ऑक्टो. ८ नोव्हेंबर ६ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू.१३,००० + रेल्वे |
| राजस्थान, (मारवाड) , जयपुर,जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | ऑक्टोबर २९ — ६ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू.३०,५०० + विमान |
| मदुराई, कोडाई केनॉल, तंजावर, रामेश्वर | नोव्हेंबर २४ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २३,००० + विमान |
| इंदौर, उज्जैन, ओंकारेश्वर, मांडू | नोव्हेंबर १८ — ४ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १६,००० + रेल्वे |
| शृंगेरी, उडिपी, गोकर्ण, मुरडेश्वर | डिसेंबर ८ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २४,५०० + विमान |
| गुजरात , सोमनाथ, द्वारका, पोरबंदर, गीरनार | जाने. २ ते ७ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १५,००० + रेल्वे |
| राष्ट्रीय तिर्थक्षेत्र, अंदमान, सेल्युलर जेल, बारटंगा, हॅवलॉक, रॉस, आयलंड | जाने. ९ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ३१,००० + विमान |
| पिठापुर (श्रीपाद श्रीवल्लभ जन्मठिकाण) भुवनेश्वर, जगन्नाथ पुरी, कोणार्क | जाने. २५ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २३,००० + विमान + रेल्वे |

# जोडीदार निवडा

**वधू पाहिजे**.......................................................................................

● **डॉ. रुपक मकरंद कारुळकर –** ब्राह्मण शाखा : देशस्थ, गोत्र : कौशिक, जन्म दिनांक : २०.०५.१९९४, जन्म वेळ : दु. ०२.३२, जन्म स्थळ : पुणे, उंची : ५.७, नाडी : आद्य, रास : सिंह, शिक्षण : Phd Robotics, Contro. System, नोकरी / व्यवसाय : सॉफ्टवेअर इंजिनिअर, Robotics, Prtland, USA, रक्तगट : AB+, मासिक उत्पन्न : १२५००/- USD, अपेक्षा : कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेतील अमेरिकेत राहणारी, International degree holder, अथवा इथे नोकरी करत असल्यास अमेरिकेत ट्रान्सफर मिळू शकणारी, उंची ५-५.७, अव्यंग, निरोगी, पोटशाखेचा, गाव / शहर : अंबरनाथ (पूर्व), संपर्क क्र. : ९१९८८१७१७१ / ९१९८२२०३७२५५. Email- mmkarulkar@gmail.com, mskarulkar@gmail.com

● **देवेश रामचंद्र कुळकर्णी** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : अत्रि, जन्म दिनांक : २८.१२.१९८७, जन्म वेळ : स. ०६.५८, जन्म स्थळ : भुसावळ, उंची : ५.१०, नाडी : - , रास : मिन, शिक्षण : मॅकेनिकल इंजिनिअर, नोकरी / व्यवसाय : सरकारमान्य ई सेवा केंद्र, मोटर वाहन संबंधित कामे, रक्तगट : -, वार्षिक उत्पन्न : १ ते दिड लाख मासिक, अपेक्षा : कोणत्याही शाखेची पदवी, गाव / शहर : भुसावळ, संपर्क क्र. : ९४२१८७४३२९ / ९६०७७५२२७८.

● **प्रथमेश श्रीपाद कुलकर्णी** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : कौडिंण्य, जन्म दिनांक : ०९.०८.१९९५, जन्म वेळ : रात्रौ. १०.०७, जन्म स्थळ : सोलापूर, उंची : ५.६, नाडी : अंत्य, रास : मकर, शिक्षण : B.E. (Computer), नोकरी / व्यवसाय : नोकरी, रक्तगट : $O^+$, वार्षिक उत्पन्न : ९ लाख बोनस, अपेक्षा : नोकरी करणारी, अनुरुप, संपर्क क्र. : ९४२३२४४९२१ / ९८९०९२८३५५.

● **निनाद राघवेंद्र देशपांडे**, ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : भारद्वाज, जन्म दिनांक : २०.०१.१९९५, जन्म वेळ : सकाळी ०९.५२, जन्म स्थळ : सांगली, उंची : ५.५, नाडी : मध्य, रास : सिंह, शिक्षण : B.E. (Computer), नोकरी / व्यवसाय : नोकरी Keywordio Co. Pune (MNC), वार्षिक उत्पन्न : ५ लाख, अपेक्षा : सुसंस्कृत, मनमिळावू, सुस्वाभावी, अभियंता पदवीधर, पारंपारिक व आधुनिकतेचा समन्वय साधणारी, संपर्क क्र. : ९२८४३३८१७०.

## देणगी

श्री. वसंत दत्तात्रय गुर्जर राहणार डोंबिवली जिल्हा ठाणे यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास आरोग्य निधीसाठी रु. १०,००१/- ची देणगी प्राप्त झाली आहे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या आरोग्य निधीसाठी ही मदत वापरावी अशी विनंती करण्यात आली आहे. श्री. वसंत दत्तात्रय गुर्जर यांचे मध्यवर्ती मंडळाच्यावतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.

## श्रद्धांजली

### भारताच्या हरित क्रांतीचे जनक हरपले

भारतीय हरित क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या वयाच्या ९८ व्या वर्षी दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी निधन झाले. कृषी संशोधक असलेल्या डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचा जन्म ७ ऑगस्ट १९२५ रोजी तामिळनाडूतील तंजावूर येथे झाला होता. भारत सरकारने १९७२ मध्ये पद्मभूषण, १९८९ मध्ये पद्मविभूषण, १९९७ मध्ये पद्मश्री पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले होते. शेती क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे जगभरात त्यांना सन्मान मिळाला होता. अमेरिकन संशोधक नॉर्मन बोरलॉग आणि अनेक वैज्ञानिकाच्या मदतीने गव्हाची जादा उत्पन्न देणारे (HYV) बिजाचा शोध लावला. भारतीय कृषी संशोधन परिषदेत आणि आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेत त्यानी मोलाचे काम केले आहे. अशा या थोर महात्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली.

# अभिनंदन

✻ श्री. रमेश रामराव पाटील गोकाक टेक्सस्टाईल लि.चे मॅनेजींग डायरेक्टर आणि आपल्या मध्यवर्ती संस्थेचे जेष्ठ सभासद यांची दि टेक्सस्टाईल असोसिएशन (इंडिया) या संस्थेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. श्री. पाटील यांचे अभिनंदन आणि पुढील भावी काळासाठी शुभेच्छा.

✻ सौ. केतकी कुलकर्णी यांना सुखकर्ता सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे या संस्थेच्या तर्फे सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरवण्यात आले आहे. पुणे येथे दि. ०२.१०.२०२३ रोजी संपन्न झालेल्या एका विशेष कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. श्री. दत्ताजी कोहीमकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

✻ श्री. मिहीर सदानंद घोटीकर यांच्या एच डी फायर प्रोटेक्ट या प्रतिथयश कंपनीस कौन्सील जनरल ऑफ ऑस्ट्रेलिया यांचा ऑल इंडिया एक्सपोर्टस् एक्सलन्स FII ॲवार्ड नुकत्याच संपन्न झालेल्या एका समारंभात मिसेस मजेली हिंद व ठाण्याचे कलेक्टर श्री. अशोक शिंगारे (IAS) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. श्री. मिहीर सदानंद घोटीकर यांचे अभिनंदन.

✻ सिध्देश मुकुंद पांडे (ठाणे) ह्या आपल्या देशस्थ ऋग्वेदी युवकाची, टेबल टेनिस खेळातील घौडदौड व नेत्रदीपक कामगिरी आपल्या सगळ्या समाज बंधूभगिनींसाठी अभिमानाची व आनंदाची बाब आहे. सिध्देश हा आपल्या भारत देशाचा एक अग्रगण्य टेबल टेनिस खेळाडू आहे. त्याच्या सातत्यपूर्ण, दैदीप्यमान यशाबद्दल महाराष्ट्र सरकारकडून क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा व मोठ्या प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार देऊन दि. २८ ऑगस्ट २०२३ रोजी महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल, तसेच माननीय मुख्यमंत्री, क्रिडा मंत्री ह्या मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सिध्देशला प्रदान करण्यात आला. गेले १७ वर्ष सिध्देश विविध देशात भारताचे प्रतिनिधित्व करतोय. त्याने अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून भारताचे प्रतिनिधित्व करतांना कझाकिस्थान खुल्या स्पर्धेत कास्यपदक, इंडिया खुल्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले आहे. कॉमन वेल्थ चॅम्पियनशिप स्पर्धांमधून त्याने भारतीय संघातून सहभाग नोंदवला आहे. राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत त्याने असंख्य सुवर्ण, रौप्य, कास्यपदक मिळवली आहेत. ऑलिम्पिक स्परेधेसमान, दरप४ वर्षांनी भरवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय खेळ स्पर्धा २०१५ व २०१८ मध्ये महाराष्ट्र संघात त्याची निवड झाली होती. तिथेही महाराष्ट्र संघाने पदकांची कमाई करून महाराष्ट्राच्या शिरपेचात यशाचा तूरा रोवला. २०१८ सालच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सिध्देश ने सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले आहे. गेली ५ वर्षे तो महाराष्ट्र राज्याचा प्रथम मानांकित खेडाळू आहे. वयाच्या २१ व्या वर्षी भारत सरकारने त्याची खेळातील प्रगती बघून आता त्याची आयकर विभागात निरीक्षक पदावर नेमणूक झाली आहे. सिध्देशच्या यशाबद्दल त्याचे मनापासून अभिनंदन आणि भावी कारकिर्दीस शुभेच्छा.

✻ अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे आजीवन सदस्य तसेच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याणचे आजीव सदस्य / सहकोषाध्यक्ष, श्रीमान जयंत लक्ष्मण देशमुख यांचे चिरंजीव श्री. अमित जयंत देशमुख यांनी डॉक्टरेट इन फिलॉसॉफी (Ph.D) इन मेडिटेशन ऑन हरे कृष्ण मंत्रा मुंबई विद्यापीठातून प्राप्त केली. ते वाणिज्य शाखेचे पदवीधर, मास्टर इन आर्टस् आहेत आणि ते सहाय्यक प्राध्यापक म्हणून सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात (पालघर) येथे कार्यरत आहेत. तसेच ते ज्योतिष शास्त्र, हस्तरेखा तज्ञ, अंकशास्त्र, सायबर क्राइम शोधक, योगा, वास्तुशास्त्र सल्लागार म्हणून पण नावाजलेले आहेत. त्यांना इस्कॉन या संस्थेतर्फे भक्ती शास्त्री म्हणून गौरविण्यात आले आहे. अशा या वैशिष्ट्यपूण असलेल्या श्री. अमितरावांचे तसेच समस्त देशमुख परिवाराचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दीक शुभेच्छा.



*With*
*Best*
*Compliments*
*From*

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

Best Wishes From

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357


**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

**AKSHAY DEPOSIT***

| | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |

Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years)



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)
Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

# डॉ. संजीव राजाराम धारवाडकर यांचा सन्मान सोहळा वडोदरा (गुजरात)




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH